इतिहासातील हिराबाग

अथवा

हिराबागेचा इतिहास

(संशोधक — य. न. केळकर)

☆



टॉऊन हॉल कमिटी–हिराबाग–पुणे २.

इतिहासातील हिराबाग

अथवा

हिराबागेचा इतिहास

☆

(संशोधक—य. न. केळकर)

टाऊन हॉल कमिटी—हिराबाग—पुणे २.

: प्रकाशक :

भा. वि. भागवत व श्री. वि. दामले

जॉईंट सेक्रेटरीज् टाऊन हॉल कमिटी

हिराबाग ५८९।१ शुक्रवार पुणे २.

: मुद्रक :

सुधीर दामले

एन. के. प्रिंटर्स

१७१, संझगिरी सदन,

गिरगांव मुंबई ४.

इतिहासातील हिराबाग

अथवा

हिराबागेचा इतिहास

(संशोधक — य. न. केळकर)

ही बाग व तींमधील बंगला प्रथम नानासाहेब पेशव्यांनी तयार केला. बाग पर्वती तळ्याचे काठीं आहे. बागेतील सध्याच्या ' हिराबाग क्लबची ' जी इमारत आहे तीच प्रथम नानासाहेब यांनी बांधलेली. जुन्या मूळ स्वरुपात आतापर्यन्त अनेक फेरफार अर्थातच होत आलेले असले तरी मूळ इमारतीच्या काहीं कांहीं खाणाखुणा अद्यापही ओळखता येतात. मूळ बंगल्यासमोर एक कारंजें केलेले होते. त्यातून पाणी उडविण्याचा खेळ करण्यासाठीं विहीरीजवळ एक उंच बुरुज बांधून त्यावर राहाटगाडग्याने ते पाणी चढवून तेथे पाण्याचा खजिना केलेला होता. तो ' खजिना बुरुज ' अद्यापही दिसतो. बंगल्याच्या दुसऱ्या मजल्यावरील दालन जुनेच पण शाबूत असून त्यावरील कलाकुसरीचे काम प्रेक्षणीय आहे. हिराबागेचे क्षेत्रफळ १२॥ (साडेबारा) एकरांचे आहे. वर उल्लेखिलेली विहीर नैऋत्य कोपऱ्यांत आहे.

कोणी म्हणतात, नानासाहेब पेशव्यांची 'हिरा' नांवाची कोणी कळवंतीण होती. तिला या बागेतील बंगल्यात ठेविली होती आणि त्यामुळे बागेला ' हिराबाग ' असे नाव पडले. तथापि पेशवेदप्तरात नानासाहेब पेशव्यांच्या सर्व नाटकशाळांची नावे नमूद आहेत, त्यांत ' हिरा ' नांवाच्या कोणा नाटकशाळेचा आढळ होत नाहीं. शिवाय असेही वाचल्याचे स्मरते की चिमाजी आप्पासाहेब व नानासाहेब पेशवे यानी मस्तानीला नजरकैदेत ठेविले होते ते हिराबागेतच. तें खरे असले तर हिराबाग नानासाहेब पेशव्यांच्या

पूर्वीही अस्तित्वांत होती असें ठरेल. तथापि याची अधिक चौकशी व संशोधन होणें जरूर आहे.

या बागेसंबंधी पेशवे दप्तर भाग ९ मध्यें एक बिनामित्तीचे पत्र छापले आहे. त्यातील मजकुरावरून तें हिराबागेतील बंगल्यासंबंधी व इतर इमारतीं-संबंधीच आहे असे निश्चित म्हणता येते. ते पत्र असें.

"सेवेसी विज्ञापना–इमारतीची कामे, नाचाचा दिवाणखाना व धरणे वगैरे नेमणुकीप्रमाणें जलदीने तयार करणें म्हणोन स्वामीनी पत्री आज्ञा केली. ऐसियासी नाचाच्या दिवाणखान्याचे काम जोतीं तयार करून जोडणी उभी केली. हौदाचे काम चालीस लाविती. थोरले दिवाणखान्यापुढील चौसोपीचे काम चालत आहे. तेही तयार होईल. पर्वतीचे वाटेवर तळ्याची माती भर बहुतेक टाकली, वाट तयार होत आली. फरासखान्याचा सोपा तयार झाला. धरणाचे काम चालीस लावले आहे. वरकडही आज्ञेप्रमाणें कामे तयार होतील."

यानंतरचा या बागेसंबंधी उल्लेख सापडतो तो सन १७५०. मधील कांहीं अनुष्ठानासाठीं या बागेतील बंगल्यात पेशवे सरकारातून ब्राह्मण जमविल्याची नोंद राजवाडे खंड ६ मधील पुरंधरे शकावलीत आलेली आहे.

थोरल्या माधवराव पेशव्यांच्या लग्नांत या बागेत ब्राह्मण भोजने घातल्याची दुसरी एक नोंद उपलब्ध झाली आहे.

पानपतच्या अरिष्टानंतर दोनच वर्षांत सन १७६३ साली पुण्यावर निजामाच्या स्वारीची आपत्ति ओढवली. त्यावेळीं निजामाने पुण्याकडून तीन लक्ष खंडणी घेऊनच्या घेऊन वर सर्व शहर जाळून उद्वस्त केले ! त्यानें पुण्याच्या तोफखान्यातून तोफा नेल्या व फरासखाना सबंधच्या सबंध लुटला. सर्व देवळातून जितक्या म्हणून मूर्ति सापडल्या तितक्या छिन्न विच्छिन्न केल्या मोठमोठ्या हवेल्या पाडून टाकल्या. कित्येक पेठांच्या पेठा जाळून टाकल्या. तोफखानेवाले पानशांच्या वाड्यास आग लावली ती नागझरीला जाऊन मिळाली ! पर्वती विध्वंस झाली. तेथे सरकारी वाडा व चाळीस हजार. ब्राह्मणांच्या बसावयाच्या धर्मशाळा होत्या त्या जळून गेल्या. अर्थात त्यात हिराबाग व त्यातील बंगले यांचाही विध्वंस झाला,

पुढे १७६४ साली थो. माधवराव पेशव्यांनी पुन्हा हिराबाग लागवडीस आणण्याचे ठरविले. त्यासंबंधी त्यांनी २१ मे १७६४ रोजीं नाना फडणिसांस ज्या सूचना केल्या त्या अशा–

"पर्वतीचे तळ्याचे बागांत बंगला आहे, त्यास इमारत जळून भिंती उभ्या राहिल्या आहेत त्या वाईट दिसतात. यास्तव त्या भिंती पाडून इटा जमा करून ठेवणे आणि जागा हमवार (म्ह. सपाट, सारखी) करणे. जुने जोतें राहील त्यावरी चौमोली (म्ह. चौपाखी) परबंदी (म्हणजे चौफेर) बंगला करणें. आत झाडें आहेत त्यास आळी बांधून पाणी लावून गुलजार (ताजी-तवानी) करणें" (पे. द. भा. ३२ प. नं. २०८).

या नंतर सवाई माधवरावांच्या कारकीर्दीपासून या बागेचे उल्लेख बरेच सांपडतात. या कारकीर्दीतच पुन्हा एकदा नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दी-इतका पेशवाईच्या वैभवाचा परमोत्कर्ष झाला होता.

'भुजंगराजे भुलति सुवासिक दिवाण मैलागर
राजकारणीं एक नटनागर'

म्हणजे नाना फडणीसांच्या अमोघ राजकारणकौशल्यामुळें आणि त्यांच्या चोख करड्या कारभारामुळेंच खाशा पेशव्याला निभ्रांतपणे मनासारख्या क्रीडाकरमणुकीत खुशाल वेळ घालवता येत होता!

नाना फडणिसानी सवाई माधवरावांच्या करता तऱ्हेतऱ्हेच्या क्रीडा व खेळ उपलब्ध करून दिले होते. रमण्याजवळील पार्वतीमागच्या टेकड्यांवर हरणांचा पाठलाग करणे, किंवा शेजारी असलेल्या शिकारखान्यातून वाघ आणून त्यावर हत्ती घालण्याचा तमाशा पाहणे, किंवा वज्रमुष्टींच्या लढाया लावणे, असे विविध प्रकारचे खेळ सवाई माधवराव खेळत. त्यावेळीं बहुधा ते रोजच या हिराबागेत जात. ते लहान असता एकदा त्याना रेशमाचे किडे पाळण्याचा छंद लागला होता. ते किडे त्यानी या हिराबागेतच पाळले होते, असे पेशवा रोजकीर्दीतील एका उल्लेखावरून कळते. सवाई माधवरावांच्या पहिल्या लग्नाचा समारंभ पुण्यात न भूतो असा 'घणघोर' झाला. त्यावेळीं खुद्द छत्रपति आणि निजामाचे प्रतिनिधी म्हणून त्याचे पुत्र पोलादजंग असे पुण्यास लग्नासाठी

मुद्दाम आले होते. त्यावेळीं निजामाला उतरण्यासाठी हिराबाग दिला होता. लग्नानंतर पेशव्यातर्फे तेथे निजामाला मोठी मेजवानी देण्यांत आली होती. त्यावेळीं सर्व सोन्यारुप्याची ताटेवाट्या पंगतीत मांडली होती !

याच वेळची तत्कालीन सामाजिक परिस्थितीवर प्रकाश टाकणारी एक गोष्ट नमूद करण्यासारखी आहे, ती ही कीं त्या मेजवानीनंतर पंक्तीत उपयोगांत आणलेली सर्व सोन्यारुप्याची भांडी पुन्हा आटवण्यात आली ! कारण त्याना म्लेंछसंसर्ग झालेला होता !

सवाई माधवरावसाहेब कित्येक वेळां सहकुटुंब पर्वतीच्या तळ्यांत नौकाविहारासाठीं येत, त्यावेळीं हिराबागेत जाऊन दिवसभर तेथें राहून वनभोजन करावे असेही घडे. त्यासंबंधी एक मनोरंजक जमाखर्ची नोंद पेशव्यांच्या वाकनिसांच्या जमाखर्चात सांपडते ती अशी—

विनंती उपरी वाड्यांत पत्रावळी सुमार

९०० हिराबागांत खासा स्वारी भोजनास गेली तेथे मांडावयास.

९०० सौ. रमाबाई (पेशव्यांचे कुटुंब) यांजकडे किरकोळ कुणबिणी वगैरे द्यावयास

१००० एक हजार पत्रावळी द्याव्या.

छ १ जमादिलाख इसने तिसैन यमाजी जासूद

छ ३ जमादिलाख चिठी तर्फे रामचंद्र बल्लाळ करंदीकर (पुणे न. सं. खं. ४ पृ. ४९).

सन १७९१ सालचा पेशवे दप्तरांत एक दाखला सांपडतो त्यावरून त्यावेळीं पेशवे सरकारच्या अनेक बाग किंवा बागा होत्या परंतु त्यापैकी फक्त १३ च बागा तेवढ्या सरकारने स्वतःच्या देखरेखीखाली ठेवल्या होत्या आणि बाकीच्या सर्व आपल्या निरनिराळ्या मुत्सद्यांकडे किंवा सरदारांकडे कमाविशीस दिलेल्या होत्या. सरकारने स्वतःकडे राखलेल्या १३ बागा अशा :—

१. हिराबाग, २. सारस बाग, ३. वसंत बाग, ४. मोती बाग. ५. माणिक बाग, ६. पर्वती बाग, ७. बंगला बाग, ८. वानवडी बाग,

९. हिंगणे बाग, १०. रमणा बाग, ११. वडगांव बाग, १२. पाषाण बाग, १३. कात्रज बाग.

परंतु पेशव्यांनी सर्वांत अधिक उपयोग या हिराबागेचाच केलेला दिसतो. आधी पुण्याला अगदी नजिक, पर्वतीही शेजारी, बागेच्या पूर्वेस पर्वतीचे तळे, त्यांत नावा खेळविण्याची सोय, तसेच पलीकडे शिकारखाना यामुळे सवाई माधवरावांचे हिराबागेंत वारंवार जाणे पडे. हिराबागेच्या काठालाच छोटा दगडी घाट बांधून तेथे नावा लावण्यासाठीं धक्का किंवा व्हार्फ केलेला होता.

होळीच्या मोठ्या सणाच्या आधीचा माघ शु॥ १५ चा म्हणजे वसंत पंचमीचा समारंभ व दरबार या बागेतच सवाई माधवराव करीत असत. वसंत ऋतूच्या स्वागतार्थ होणाऱ्या या समारंभात ब्राह्मणांची पूजा मंत्रजागर व सत्कार केला जाई

याच हिराबागेशी एक महत्त्वाची ऐतिहासिक घटना निगडीत आहे. महादजी शिंदे यांनी पुण्यास येऊन नानास राज्यकारभारातून काढून तो कारभार स्वतःकडे घेण्याची महत्त्वाकांक्षा धरली होती. त्यावेळी सैन्यबळाच्या योगाने शिंदे कर्तुमकर्तुम् झाले होते. त्यानी पेशव्याला नाना तऱ्हेच्या क्रीडा करमणुकींत निहायत खूष करून सोडले होते. अशा स्थितीत त्यांनी एकदा आपले मनोगत खुद्द पेशव्यांपुढे व्यक्त केले. परंतु पेशव्यानीच फार धोरणीपणाने तो डाव कसा हुकवला त्याचे वर्णन मुळांतच वाचनीय आहे ते असे–

"एके दिवशी पेशव्यांची स्वारी पर्वतीस दर्शनास गेली त्या दिवशीं महादजी शिंदे स्वारीसमागमे होते. त्यावेळेस देवदर्शन करून सरकारची स्वारी खाली आली तेव्हां हिराबागेपाशी स्वारी उभी राहिली. श्रीमंत पर्वतीचे तळ्यांत नाव खेळावी म्हणून हत्तीवरून खाली उतरून नावेत बसावयास चालले. त्या समई महादजी शिंदे यांचा हात धरून उभयता नांव खेळावयास लागले. कोणी एक दुसरे नाहीं. एक श्रीमंत, दुसरे महादजी शिंदे, तिसरा नावाड्या. चवथे मनुष्य नाहीं. अशी संधि पाटीलबोवा यानी पाहून श्रीमंतापाशी बोलावयास प्रारंभ केला आणि म्हणतात. "महाराज! मी हिंदुस्थानातून आलो तो हेतु महाराजानी पूर्ण केला पाहिजे. पुणे मुक्कामी सरकारची दिवाणगिरी करावी

व सर्व राज्याचा कारभार करावा याप्रमाणें माझा हेतू आहे, तो सरकारानी शेवटास नेला पाहिजे. नाना जो कारभार करतात तो मजकडे सांगावा" अशी बोलणी श्रीमंतानी ऐकून घेऊन श्रीमंत त्यांस म्हणाले, "तुम्ही बोलला ही गोष्ट बरी आहे. परंतु माझा मनोदय असा आहे, हा तुम्हांस सांगतो. माझा उजवा हात नाना फडणीस व डावा हात महादजी शिंदे ! हे दोन्ही हात कायम आहेत तेथपर्यन्त मी राज्यकारभाराविषयीं बेफिकीर आहे! म्हणूनच राज्य करताना खेळ खेळतो! नाना तऱ्हेचे खेळ, वाघांच्या लढाया व जेठीमल्ल यांच्या कुस्त्या, वज्रमुष्टींच्या लढाया, शिकारखाने, नाना तऱ्हेचे खेळवतो. असे किती प्रकारचे खेळ खेळतो! तेव्हां या दोहो हातातील एकादा माझा हात मोडला तर सारे खटले माझ्या गळ्यांत येऊन खेळ खेळावयास रिकामपण होणार नाहीं. यासाठीं जे चालले आहे तेंच चांगले आहे. याला तुम्ही काहीं फाटा फोडू नये!" असे श्रीमंताचे बोलणे ऐकून महादजी शिंदे यास पुढे उत्तर सुचले नाहीं. मग मनांत काय समजावयाचे ते समजून स्वारी वाड्यांत पोचवून व मग निरोप घेऊन आपले लष्करांत गेले."

यानंतर दुसऱ्या बाजीरावांची कारकीर्द ! त्यांना अखेर पेशवाई पद प्राप्त झाले शिंद्यांच्या फौजेच्या जोरावर ! सवाई माधवरावांच्या मृत्यूनंतर पेशवाई दु. बाजीरावांचे धाकटे बंधु चिमाजीअप्पा यांना देण्यांत आली. पण ती टिकली नाही. नाना फडणीस पळून महाडास गेले होते. दुसरे बाजीराव शिंद्याच्या कैदेत होते. नानानी महाडहूनच मोठे कारस्थान रचले. त्यांनी शिंदे अनुकूल करून घेतले व निजाम व नागपूरकर भोसले यांनाही आपले मिळाफी बनविले. शिंद्यांचा दिवाण बाळोबा पागनीस यास कैद करविले व शिंद्यांकडून बाजीरावास मुक्त करून पेशवा केले व पुन्हा नाना पूर्वीप्रमाणे कारभारी झाले. परंतु बाजीराव व शिंदे मनातून नानांचे वैरीच असल्यामुळे ते नानांचा कारभार सुधा चालू देईनात. तेव्हा नानांनी दरबारास येण्याचेच बंद केले. त्यामुळे सर्वच कारभार खुंटला. तेव्हा नानांची समजूत काढल्याखेरीज इलाज नाही असे पाहून बाजीरावांनी आपले थोरले (दत्तक) बंधु अमृतराव साहेब यांना मध्यस्थीस घातले. ते मध्यस्थीचे एकांतातले बोलणे "हिराबागेत" झाले. ततसंबंधीचे पत्रच असे—

" छ ९ रज्जबी श्रीमंत राजश्री अमृतराव साहेब हिरा ागेत संध्याकाळचे सहा घटका दिवसास आले (तेथे) श्रीमंत रा. नानाही गेले. उपरांतिक तीन घटका रात्र पावेतो खलबत झाले. खलबतांत रा. रायाजी पाटील शिंद्याकडील व आबा शेलूकर व दादा गद्रे (नानांचे मुत्सद्दी) येणेप्रमाणे होते. अमृतराव यांनी यादी करार करून श्रीमंताकडून आणल्या होत्या. (त्यांनी) नानांस सांगितले की " अत:पर वोढू नये. सोईस काम लावावे. दादासाहेबांचे ठायी आम्ही आपणास म्हणतो त्या अर्थी बंदोबस्त करावा. बखेडा होऊं नये. श्रीमंताचा (बाजीरावांचा) कारभार अव्यवस्थ. त्याचा बंदोबस्त आपण (म्ह. मी.) करतो आपण डेऱ्यास यावे. " याप्रमाणे बोलोन गेले. त्यानंतर काल छ ७ रज्जबी रा. नाना संध्याकाळचे प्रहर दिवसास श्रीमंत बाजीराव साहेबाकडे गेले. चार घटका रात्र पावेतो बोलणे झाले " (खरे पृ. ९०, ९१)

ही सन १७९७ तील घटना. पण ठरल्याप्रमाणे नाना व बाजीरावांची खरी मनशुद्धि झालीच नाही. कारण बाजीराव व शिंदे या दोघांना काम आटोपताच नानांना गुंडाळून ठेवायचे होते. त्यांतच पुढे बाजीरावांचे अमृतरावाशीच वाकडे आले. कारण दौलतराव शिंद्याच्या घरांत मोठा गृहकलह लागून दौलतरावांच्या सावत्र आया म्ह. महादजी शिंद्यांच्या बायका या दौलतरावाच्या अनन्वित अनाचारामुळे त्याच्या विरुद्ध बंड करून उठल्या. त्यांची बाजू अमृतरावाने घेतली. त्यातच बाजीरावांनी दौलतरावाकरवी नानांना दग्याने कैद केले. नंतर पुण्याचा कारभार दौलतरावांच्याच हातांत गेला. त्याचे लक्ष फक्त पैशावर असल्यामुळे पुण्यातील प्रजेवर बाजीरावादेखत अनन्वित अत्याचार त्याने केले. तथापि घडी बसेना. तेव्हा नानांना मुक्त केल्याखेरीज काहीही सरळ होणे शक्य नाही असे पाहून शिंद्यानी नानांना बंधमुक्त केले व अमृतरावाशी समेट करून घेण्याचा प्रयत्न केला व पुन्हा नानांना कारभारी केले. या सलोख्याच्या जाहीर भेटीचा समारंभ हिराबागेतील आंबराईत झाला होता. त्या भेटीचे वर्णन करणारे पत्र असे.

ता. २२-९-१७९८

" छ ८ रोज बुधवार श्रीमंतानी (दु. बाजीराव) स्वारी तयार करोन

चिंचवडकर देव आले होते त्यांचे दर्शन घेतले. मग शनवार वाड्यात आले. तेथे दौलतराव शिंद्याकडून रामाजी पाटील आले होते त्यांचे म्हणणे पडले की रावसाहेबांचे (म्ह. अमृतराव पेशवे) व आमचे (शिंद्यांचे) सख्य करवून द्यावे व तसा भेटीचा समारंभ करविला पाहिजे. त्याप्रमाणे ठरून श्री पर्वती-नजिक हिराबाग आंबराईत भेटी झाल्या. मागील चार घटका दिवस राहता प्रथम दौलतराव शिंदे व अमृतरावसाहेबांची भेट झाली. नंतर काशीराव होळकर रावसाहेबांस भेटले. मग शिंदे कुर्निसात करून त्रिवर्ग पेशव्यापुढे (म्ह. बाजीराव, चिमाजीआप्पा व अमृतराव) उभे राहिले. नंतर पाठीमागून नाना फडणीसांची भेट झाली. पण ती नुसती सन्मुख नजरानजर. नाना तसेच जाऊन पालखीत बसले. (पळशीकर दप्तर)

शिंद्याचे लष्करी बळ जबरदस्त असल्यामुळे बाजीरावांचे सर्व कूट डाव मनासारखे सफल होत गेले व दौलतराव शिंद्याचे ते उपकार बाजीराव कधीही विसरले नाहीत. त्याचे प्रत्यंतर दाखविणारी एक अप्रसिद्ध दिनचर्या आम्हाला हिंगणे दप्तरात उपलब्ध झाली आहे. तिच्यांत हिराबागेचाही संबंध आहे म्हणून ती उतरून घेतो.

ता. १२-१०-१८००

छ २२ जमादिलावल रोज रविवार. श्रीमंत पंतप्रधान बाबासाहेब बहादूर प्रातःकाळी स्नानपूजा करून मुजरा विठ्ठलपंत वाकनवीस, बाळाजी बाबूराव, गोविंदराव परांजपे, रामचंद्र गोसावी वगैरेंचे घेऊन नव घटका दिवस आल्या-वर श्री सांबाचे दर्शन घेऊन फराळ करून आरसे महालांत येऊन वस्त्रे लेवून चिमाप्पा साहेबास बोलावून घेऊन १२ घटका दिवस आल्यावर उभयतां घोड्यावर स्वार होऊन, चिमणाजी खंडेराव, दिवाण नरसी खंडेरायाचे यांचे येथे जाऊन, त्याचा वृद्धापकाळ आहे म्हणोन त्याचा समाचार घेऊन त्याणीं वस्त्रे श्रीमंतास आणिली होती ती श्रीमंतानी माफ ठेविली घेतली नाहीत. अत्तरपान घेवोन तेथोन ओंकारेश्वराचे दर्शन घेवोन नंतर त्रिंबकराव चिंतामण यांचे येथे आप्पाभट अग्निहोत्री आहेत तेथे जाऊन त्याचे दर्शन घेऊन तेथे काहीं ठेवून दोन घटका त्याशी बोलून तेथून निघोन घोड्यावर स्वार होऊन बुधवाराचे रस्त्याने पुण्याचे बाहेर निघोन घोडे फिरवून तमाम

स्वारीस आज्ञा केली कीं हिराबागेकडे चला. त्यास आवघे निघोन हिराबागेकडे चालते झाले. नंतर श्रीमंत व चिमाप्पासाो यांनी बाळाजीपंत पटवर्धन, मनोहरगीर गोसावी वगैरे थोडे लोक यास हमराहा घेऊन घोडे धावीत धावीत महाराज शिंदे यांचे वाड्यांत आले. नंतर शिंदे दौलतराव बहाद्दर, यांनी रुब्रु येऊन श्रीमंतास कुरनिसा केल्यानंतर श्रीमंत व चिमाप्पासाोस दौलतराव शिंदे बहाद्दरांनी नव्या बंगल्यात घेऊन गेले. तेथे आबा चिटणीस, सर्जेराव, रविराव घाटगे, बाळूजी कुंजीर वगैरे हजर झाले. खैरातनचा नाच सुरु केला. दौलतराव शिंदे यांनी पाच पाच वस्त्रे श्रीमंत व चिमाप्पासाहेबास गुजराणिली. दोन घटका दिवस राहता श्रीमंत व चिमाप्पा-साहेब तेथून उठले. श्रीमंतांनी दौलतराव यास म्हटले कीं " आमचा हेतु आहे कीं तुमची आमची पंगत एकत्र व्हावी. त्यास आमच्या सांगाते चला." दौलतराव यांनी म्हटले कीं, "आपण पुढे चलावे. मी मागाहून येतो." श्रीमंतानी म्हटले कीं "चलणे असेल तर समागमे चलावे." तेव्हां दौलतराव यांनी म्हटले कीं उत्तम आहे. नंतर श्रीमंत व चिमाजीसाो एका अंबारीत स्वार झाले व दौलतराव यास खवासींत बसविले. मग सवारीचा लवाजमा आवघा बोलावल्याप्रमाणें हिराबागातून आला होता त्यासहवर्तमान, अर्ध घटका दिवस राहातां वाड्यांत दाखल झाले. नंतर श्रीमंतानी संध्या करून पांच घटका रात्र गेल्यावर दौलतराव शिंदे व आबा चिटणीस, यादवराव भास्कर, वगैरे १७ आसाम्यासुद्धां भोजन करून आरसे महालात आले. दौलतराव शिंदे यास ९ वस्त्रे दिली. प्रहराचे अमलामध्यें दौलतराव शिंदे निघोन स्वार होवोन गेले."

ही हिराबाग पुढे बाजीरावसाहेबांनी सदाशिव माणकेश्वरास दिली. कारण त्याच्यावर त्यांची मर्जी बसून त्यानी सदाशिव माणकेश्वरास आपली दिवाणगिरीही दिली होती. त्यासंबंधी खरे पृष्ठ ६७७२ वरील पत्रांत असा उल्लेख आहे.

" हिराबाग सदाशिव माणकेश्वर यांस द्यावयाचा करार पेशजी झाला होता. काल त्यास सनद दिली. हिराबाग ही तळ्याचे काठी चारदिवाळी आहे. आंत बंगले वगैरे अजमासें लाख रुपयांची इमारत आहे. श्रीमंतानी कृपा

करून माणकेश्वरास दिला (पैवस्ती १९ जमादिलावल इहिदे मयातेन सन १८००).

ही १८०० सनातील हकीगत. यानंतर पुढील वर्षी हिराबागेतील पूर्व पश्चिमेकडील नवी भिंत घालण्याकरतां बाजीरावानी सदाशिव माणकेश्वरास १० हजार रुपये दिले (३१ जुलै १८०१ इसन्ने मयातेन १९ रबिलावल). तसेच बागेची कमावीस सदाशिव माणकेश्वराकडे, म्हणून बागेच्या रखवालीसाठी त्याला दहा प्यादेही देण्यांत आले. (२३ रजब इसन्ने मयातेन म्ह. ३० डिसेंबर १८०१).

ह्यानंतर १८०२ व १८०३ ही साले होळकराच्या पुण्यावरील स्वारीमुळे राज्यक्रांतिसारखी गेली. बाजीराव वसईस पळून गेले. अमृतराव हा होळकराचा पक्षपाती तो मात्र पुण्यास राहिला होता. अमृतरावाने याचवेळीं आपले एक लग्नही उरकून घेतले. हें लग्न हिराबागेतच झाले. त्यासंबंधी एका पत्रांत उल्लेख असा आहे.–

"विशेष इकडील मजकूर श्रीमंत राजश्री अमृतरावसाहेब यांनी आपले लग्न फाल्गुन मासी वद्य १० स केले. हिराबागांत रमण्याजवळ मुक्काम आहे (खरे पृ. ७७५९, ७ एप्रिल १८०३)

वसईच्या तहानंतर इंग्रजांचा आश्रय घेऊन बाजीराव पुन्हां पुण्यास पेशवेपदावर बसल्यावर त्यानी इंग्रज अधिकाऱ्यांना याच हिराबागेत मेजवान्या दिल्या. १८०३ साली पुण्यास संगमावर सर बॅरी क्लोज हा इंग्रज रेसिडेंट राहात असे. त्याच्याकडे लॉर्ड व्हॅलेंशिया हा पाहुणा म्हणून आला होता. त्याला दुसऱ्या बाजीरावानी हिराबागेंत बडी मेजवानी दिली. त्या मेजवानीचे तपशीलवार व सुरस वर्णन व्हॅलेंशियाने आपल्या रोजनिशींत लिहून ठेवलेले उपलब्ध झाले आहे. ते मोठे मनोरंजक असून त्यावरून हिराबागेच्या तत्कालीन स्थितीचे चित्रही डोळ्यापुढे चांगले उभे राहते. तो लिहितो—

"दुपारी ४ वाजल्यानंतर आम्ही लवाजम्यानिशी हिराबागेकडे निघालो. या बागेंत पेशवा नेहमी सहलीला येत असतो. तेथे त्याचा एक बंगलाही आहे. (कंन्ट्री हाऊस). आमच्या वाटेवर पेशव्याच्या स्वारीचे घोडेस्वार पसरले होते.

N. P. Bhepwe

यामुळे हिराबागेच्या दरवाज्यात शिरण्यास बराच त्रास पडला. सुदैवाने आमच्या बरोबर आमची कवायती पायदळ शिपायांची तुकडी होती. आम्ही नदी उतरल्यानंतर ती आम्हांस येऊन मिळाली आणि तिच्यामुळेच आम्हाला आपोआप पैस (म्ह. वाट) मिळत गेला.

हिराबाग एका प्रशस्त तळ्याच्या काठी वसला आहे. पर्वतीचे तळ्याचा काठ इतका दंतुर आहे कीं विचारता सोय नाहीं. तळ्याच्या मध्यभागी एक छोटेसे बेट असून त्यांत एक देऊळ आहे व त्या पलिकडे तळ्याच्या काठापासून जमीन उंचावत गेलेली असून तिचेच पर्वतीच्या टेकडींत रूपांतर झालेले आहे. त्या टेकडीच्या शिखरावर पर्वतीचे पांढरे शुभ्र देऊळ सुंदर दिसते.

हिराबागेतील बंगला मात्र अगदी सामान्य असून तो संपूर्ण बांधून असा कधीच झालेला नाहीं. बाग मात्र उत्कृष्ट असून तींत नारळीची व आंब्याची खूपच लागवड केलेली आहे. घाटावर अशी कलमी आंब्याची व नारळीची लागवड क्वचितच आढळते. ही नारळीची आगरे व आंब्याच्या राया पाहून मोठा चमत्कार वाटला.

आम्हा पाहुण्यासाठी बंगल्यातील एका पडवीत बैठक केली होती. बैठकीसमोर द्राक्षांचे घनदाट मांडव लागलेले असून त्यातून कारंजाचे फवारे उडत होते.

थोड्याच वेळांत आम्हांस भोजनास उठण्याची सूचना झाली. भोजनाची व्यवस्था वरच्या मजल्यावरील गच्चीत केली होती. खासा पेशवा एका मागच्या वाटेने वर गेला आणि आम्ही एका अरुंद जिन्याने दोहोबाजूस दोन गच्च्या आहेत अशा स्तबकावर आलो. त्यापैकीं एका गच्चीवर आमची पाने मांडली होती. खाली पांढरा शुभ्र सरपोस पसरून त्यावर इंग्रज पाहुण्यासाठीं केळीचे मोठमोठे ठाव मांडले होते. प्रत्येक ठाव विविध ब्राह्मणी पक्वान्नांनीं नुसता गजबजून गेलेला होता. साधा व केशरी भात, कागदासारख्या पातळ पाटवड्या, पुरण पोळ्या, असे किती तरी प्रकार. केळीच्या ठावाची एक बाजू रंगीबेरंगी मिठाईने भरलेली तर दुसऱ्या बाजूस भाज्या व चटण्या कोशिंबिरी. ठावा शेजारीच

केळीच्या हिरव्यागार मोठमोठ्या द्रोणातून तूप, ताक, दही ठेवलेले. आम्ही आमचे काटे व चमचे नेलेच होते म्हणून बरे झाले. नाहींतर पंचाईत झाली असती. भोजन चालू असता खासा बाजीरावसाहेब पेशवे पंक्तीपासून थोड्या अंतरावर दूर समाचारास येऊन बसले. ते ब्राह्मण असल्यामुळे आमच्या पंक्तीस भोजनास बसणे त्याना शक्यच नव्हते !"

दुसरे बाजीराव इंग्रजांच्या मदतीमुळे वसईहून पुण्यास येऊन पुन्हा पेशवेपदावर बसले त्यावेळी त्याना पुण्यास आणण्याचे काम सुप्रसिद्ध सेनापति जनरल वेलस्लीकडे होते. बाजीरावसाहेबानी त्याला याच बागेत मेजवानी करून पोषाक देऊन आपली कृतज्ञता व्यक्त केली. त्यासंबंधी पेशवे दप्तरातील जमाखर्चात वेलस्ली व त्याचा स्टाफ याना पुढीलप्रमाणे पोषाख दिल्याचा दाखला सापडतो तो असा—

	पोषाख किं. रु.
जनरल वेलस्ली	४९९
मि. वेब	३७६
कर्नल कोलमन	३६१
मि. गुडविन	१८२
मेजर इसडेन	२०६-१२-०
कॅप्टन बकनील	१७४-१४-०
लेफ. यंग	१८०-१४-०
कॅप्टन नॉक्स	१३३-१२-०
कॅ. कॅम्बेल	१३४-०-०
डॉ. वॅलर	१३७-८-०
मिस्टर इस्कारील	१३७-१४-०
मिस्टर क्लोस	१२८-१०-०
मिस्टर बोलिंगहॅम	१३६-८-०

	पोशाख किं. रु.
गोविंदराव	२४७–८–०
आप्पाराव	१७९–७–०
रामराव	४९–८–०
सुब्बाराव	३६–१०–०

हे खालचे चारी लोक दुभाषे किंवा तत्सम नोकर.

सन १८०३ सालानंतर या बागेचा उल्लेख ऐतिहासिक पत्रव्यवहारांत तुरळकच आढळतो.

१८–१–१८०८ सालची एक नोंद सापडली आहे ती अशी (दु. बा. जमाखर्च पेशवे दप्तर)

४८३ रुपये हिराबागेत इंग्रजास मेजवानीचे वेळी वस्त्रें पोषाकाबाबत खर्च छ ७ जिलकाद.

१८१८ साली पेशवाई समाप्त झाल्यावर पेशव्यांची सर्व मालमत्ता कंपनी सरकारच्या मालकीची झाली. त्या नंतर दोन वर्षांनी 'पुणे शहर सुभ्यातील' बागांची वहिवाट काय होती तो तपशील देणारा जमाखर्ची हिशेबझाडा सांपडला तो असा—

पुणे जमाव रुमाल नं. १३४ यादी शहर पुणे सुभा मजकूर येथील बागानिहाय पो सुा इहिदे अशरीन मयातेन सन १२३० फसली बेरीज रु. ६८८७–३–३ (इ. सन १८२०).

६४३८ इस्ताव्याचे बागपो बाग सुमारी २६

३ गुा रामचंद्र बल्लाळ आगाशे.

१ बाग बंगला

१ बाग हडपसर मुंढवे

१ बाग बानवडी

—

३

१ गुा भास्कर बहिरव मेहेंदळे

गणेशबाग

३ गुा नारो लक्ष्मण भट

१ राजबाग

१ लकडखाना

१ बाग पाळंदे

३

२ गुा. सदाशिव नारायण ढापरे

१ मोतीबाग

१ चकला बाग

२

८ गुा बापू भिकाजी

१ वसंतबाग

१ मस्तानीचा बाग

१ बाग कात्रज

१ माणिकबाग

१ बाग मांडवगणे

१ बाग पोतनीस

१ वाडगी सुमार ४

१ बाग कोथरूड

८

२ गुा यमाजी पायगुडे

१ बाग वानवडी

१ गणपतराव गद्रे

२

१ गुा अंबादास महाजन
बाग सशाचा

२ जनार्दन विठ्ठल पनवेलकर
१ बाग वडगांव
१ बाग सुरूंचा

—
२

१ गुा आपाजी कृष्ण
बाग बळवंतराव नागनाथ

१ गुा बाळाजीपंत नातू
बाग बाबूराव केशव

१ गुा सोराबजीशेट पारसी
बाग हिराबाग

१ गुा गुंडाप्पा पापडे
बाग मौजे हडपसर

—
२६ —
२६

१६९ लोटणबाग १
—
२७

तसेच पुणे जमाव रुमाला नं. १४३ मधील नोंद हिराबागसंबंधी आढळते ती अशी–

" जमाखर्च नगदी वसुली पो। शहर पुणे सरकार कुंपणी बहाद्दर विद्यमान पांडुरंगराव मामलेदार सुरु इसन्ने अशरीन मयातेन व अलफ सन १२३१ फसली मुताबिक सन १८२१ शके १७४३ माहे जून अव्वलसाल तागाईत छ ९ माहे जून अखेर साल पावेतो जमा

३१०–८–० हिराबाग मक्ता गुा सोराबजीशेट पारसी

सन १८३१ साली या सोराबजी पारशाने कंपनी सरकारांत पांच हजार रु. नजर देऊन बागेची मिराशी म्हणजे वंशपरंपरा मालकी मिळविली.

याबाबत कंपनी सरकारच्या दप्तरांतील अस्सल नोंद अशी सांपडते—

" हिराबाग इसन्ने सलासीन मयातेन व अलफ मध्ये सोराबजी रतनजी पटेल यास मिरास करून देण्यांत आली. बागेची मोजणी बिघे १२॥ १॥ ३ साडेबारा बिघे, दीड पांड, तीन काठ्या ५००० नजर घेऊन विकली."

चतुसीमा :– पूर्वेस डोंगरभट पुरंधऱ्याचा इनाम, दक्षिणेस रस्ता पूर्वेकडून पश्चिमेकडे पर्वतीस जातो, त्याचे पूर्वेकडे इनाम त्रिंबकराव विश्वनाथ.

१. अमरचंद बिरदीचंद

१. पश्चिमेस पर्वतीतळे १. उत्तरेस रस्ता पर्वतीचे सिवेचा

मिरासपट्ट्याचा तपशील असा—

१) सोराबजीने दरसाल १५० अंकुशी रुपये म्हणजे १४५ रु. १२ आणे २ पै इतके सुर्ती रुपये देऊन बागेचा उपभोग घ्यावा.

२) बागेतील बंगल्याची इमारत व तबेले यांचा जरुरीप्रमाणे उपयोग करण्याचा हक्क कंपनी सरकारकडे राहील. मात्र केलेल्या उपयोगाबद्दल सोराबजीस वाजवी ते भाडे देण्यांत येईल.

३) सोराबजीने व त्याच्या वंशजानी बंगल्याची पाहिजे तशी दुरुस्ती करून घ्यावी. मात्र त्या कामीं देखरेख कंपनी सरकारच्या पी. डब्ल्यु खात्याची राहील.

४) सोराबजी नंतर त्याचा जो कोण वारस असेल त्याने स्वामित्वाचा हक्क पुढे चालू करून घेण्यासाठीं ५०० रु. नजर भरली पाहिजे. तसेच ठराविक साराही त्याला भरावा लागेल. एवढे त्याने केले म्हणजे त्याला वंशपरंपरा हक्काची सनद देण्यांत येईल. या करारानुसारच पुढे दोराबजी पेस्तनजी पटेलाचा पुतण्या सोराबजी याला बागेचा हक्क मिळाला, असे कलेक्टर डंकन डेव्हिडसन याने लिहिलेल्या पत्रावरून कळून येते.

उपर्युक्त सोराबजीला पुढे मोठी खोट बसली आणि म्हणून त्याने १८६९ साली ही बाग व बंगला इंग्लंडातील ईस्ट इंडिया फिनॉन्शिअल असोसिएशन नामक कंपनीकडे गहाण टाकली. सदर कंपनीकडून त्याने द. द. शे. १० टक्के व्याजाने ८८ हजार रुपये कर्ज काढले. पण तरीही सोराबजी सावरला नाही आणि पुढे पाचच वर्षांत म्हणजे १८७० साली त्याने दिवाळे काढले. अर्थात बाग व बंगला ईस्ट इं. फि. असो. च्या ताब्यांत गेली. पुढे त्याही कंपनीचे ईस्ट इंडिया लॅन्ड क्रेडीट ॲन्ड फिनॅन्स कंपनीत रूपांतर झाले. पण ती नवी कंपनीही थोड्याच दिवसांत लिक्विडेशनमध्यें निघाली. लिक्विडेटर फ्रॅन्सिस मोवाट याने हिराबाग विकून टाकली. या नंतर पुढील साली म्हणजे १८७६ मध्यें राजारामभाऊ म्हस्के आणि महादेव मोरेश्वर कुंटे यांनी "हिराबाग टाऊन हॉल कमिटी" करतां ती रु. १९०९० रुपयांस खरेदी केली. प्रत्यक्ष खरेदीखत २१ एप्रिल १८७७ रोजीं झाले. 'हिराबाग टाऊन हॉल कमिटी' स्थापण्याचा उपक्रम रा. ब. रानड्यांचा. त्यांनीच वर्गणी जमवून संस्था स्थापून तिच्याकरतां ही जागा खरीदविली. या नंतर सात वर्षांनी याच हिराबागेत सन १८८४ साली न्यायमूर्तींच्या पत्नी (सौ.) रमाबाईसाहेब रानडे यांचे स्त्रियांच्या उच्च शिक्षणाच्या आवश्यकतेसंबंधी एक मोठे परिणामकारक भाषण झाले होते. मुंबई प्रमाणे पुण्यासही एखादा टाऊन हॉल असावा, तेथे व्याख्याने, परिसंवाद चर्चा व्हाव्यात आणि एखादे खेळ खेळण्यासाठीं सार्वजनिक क्लबसारखे स्थान असावे ही त्यांची कल्पना. म्हणून पुढे १८९१ साली तेथे डेक्कन क्लब स्थापण्यांत आला. पुण्यातील वसंतव्याख्यानमाला याच बागेत प्रथम सुरू झाली तेव्हा तिला 'वसंतोत्सव व्याख्यानमाला' म्हणत. १६ मे १८९५ च्या ज्ञानचक्षूत असे वृत्त आहे, "वसंतोत्सव व्याख्यानमाला ही कालपासून हिराबागेत सुरू झाली. लॉर्ड रे यांच्या कारकीर्दीत हिराबागेत एक मोठे प्रदर्शन भरविण्यांत आले होते."

* * *

टाऊन हॉल कमिटी
हिराबाग–पुणे २.

कार्यकारी मंडळ (१९७४)

१) डॉ. वि. शि. सोवनी (अध्यक्ष)
२) श्री. भा. वि. भागवत (सेक्रेटरी)
३) श्री. श्री. वि. दामले (सेक्रेटरी)
४) श्री. ग. वि. नातू (ट्रेझरर)
५) श्री. बा. ज. पंडीत
६) श्री. य. मो. परांजपे
७) डॉ. रं. ह. सोमण
८) डॉ. वा. रा. ढमढेरे
९) श्री. प्र. भा. भागवत